# अंतर

मी चाललो दूर, अंतर न म्हणती त्यास
गुंतले मन तुझ्यात, आधार या जीवास

असतो एकला तेंव्हा, न शब्द कामास
तू तिकडे लेऊन, चिंब नयनांची आरास

स्मरतो तुला श्वासात, संवाद हाची खास
क्षणात मिटुनी अंतर, ये साद अंतरास

भेटेन पुन्हा तेंव्हा , लाजशील गं कशास
गूज नुरले काहीच, स्वप्नी सारे कथिलेस

© सपु, www.saarthbodh.com